# प्रेसनोट

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/3531/२०१९

पुणे शहर, दिनांक १०.०४.२०१९

**विषय :- वाहतूक शाखेतील कर्मचारी यांना कुलिंग जॅकेट व कुलिंग कॅप वाटप केले बाबत.**

--------------oo-----------

वाहतूक शाखा पुणे शहर कडील वाहतुक नियमन करणारे कर्मचारी यांना, उन्हाळ्यातील असह्य उष्णतेमध्ये वाहतुक नियमनाचे कर्तव्य करावे लागत असुन सदर कर्मचारी यांना होणारा उष्णतेचा त्रास कमी होण्याकरीता, प्राज फौंडेशन, पुणे यांच्या तर्फे एकुण ५०० कुलिंग जॅकेट व ५०० कुलिंग कॅप भेट दिल्या आहेत.

तसेच शहरातील वाहतुक अपघात रोखण्याकरीता करावयाच्या आवश्यक त्या उपाय योजनांकरीता, मद्यप्राशन करुन वाहन चालविणा-या वाहन चालकांवर प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी ब्रीथ ॲनालायझरची वाहतुक शाखेस असलेल्या मागणीची पुणे महानगरपालिकाचे आयुक्त, श्री. सौरभ राव यांनी मंजुरी देवून पुणे महानगरपालिका तर्फे वाहतुक शाखेस ५० ब्रीथ ॲनालायझर पुरविले आहे.

कुलिंग जॅकेट, कुलींग कॅप तसेच ब्रीथॲनालायझर सामुग्री ही मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर डॉ.श्री. के.व्यंकटेशम् यांचे हस्ते व पोलीस उप आयुक्त,वाहतुक पंकज देशमुख यांचे अध्यक्षतेखाली वाहतुक शाखेकडील कर्मचारी यांना वाटप करण्याचा कार्यक्रम आज दिनांक- १०/०४/२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. कॉन्फरन्स हॉल,पोलीस आयुक्त कार्यालय येथे संपन्न झाला आहे.

सदर कार्यक्रमास सह पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.शिवाजी बोडखे, पोलीस उप आयुक्त,वाहतुक पंकज देशमुख, सहा.पोलीस आयुक्त- प्रभाकर ढमाले, सहा.पोलीस आयुक्त- वाकुडे व पोलीस निरीक्षक(नियोजन)- कळसकर, पोलीस निरीक्षक(प्रशासन) नाईकवाडी व प्राज फौंडेशन चे डायरेक्टर श्रीमती- परिमल चौधरी व त्यांचे संचालक मंडळ उपस्थित होते.



पुणे शहर




पुणे शहर पोलीस आयुक्तालय